चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०५ जुलै, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# शेतीच्या वादावरून भांडण करणाऱ्या आरोपींना शिक्षा

पोलीस स्टेशन कोरपना अंतर्गत फिर्यादीला गंभीर जखमी करणाऱ्या आरोपीस ०४/०७/२०१९ रोजी **श्री. पी. जे. मोडक, सत्र न्यायाधीश क्र. ४, सत्र न्यायालय, चंद्रपुर यांनी शिक्षा** ठोठावली.

पोलीस स्टेशन कोरपना अंतर्गत मौजा धानोली येथे राहणारे आरोपी नामे १) सखाराम गोविंदा मेश्राम वय ३०, २) गोविंदा जंगा मेश्राम वय ६५ वर्ष दोन्ही राहणार धानोली ता. कोरपना, हे आणि यातील फिर्यादी यामध्ये शेतीच्या हिस्यावरून वाद सुरू होता. दिनांक १७/०८/२०१२ रोजी यातील आरोपी आणि फिर्यादी यांचेत वाद झाल्याने आरोपीतांनी फिर्यादीच्या डोक्यावर कुऱ्हाडीने मारून गंभीर जखमी केले. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कोरपना येथे अप. क्र. ५३/२०१२ कलम ३२३, ३०७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोनि. श्री. कुंवर, पोलीस स्टेशन कोरपना यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०४/०७/२०१९ रोजी **आरोपी नामे १) सखाराम गोविंदा मेश्राम वय ३०, २) गोविंदा जंगा मेश्राम वय ६५ वर्ष दोन्ही राहणार धानोली ता. कोरपना, यांना कलम ३२३ भादंवि मध्ये कोर्ट सुटेपर्यंत स्टॅडींगची सजा व कलम ३०७ भादंवि मध्ये ३०००/—रू दंड न भरल्यास १ महिन्याची शिक्षा. श्री. पी. जे. मोडक, सत्र न्यायाधीश क्र. ४, सत्र न्यायालय, चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. ए.एस.शेख, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन **नापोशि. नरेंद्र खोब्रागडे,** पोस्टे कोरपना यांनी काम पाहिले.

---

# ब्रम्हपुरी येथील घरफोडी करणारे अटट्ल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

दिनांक ०१/०५/२०१९ चे दुपारी ०१:०० वा. ते ०४:०० वा. दरम्यान फिर्यादी नामे प्रमोद विठठलराव रडके वय ३७ वर्ष रा. शांतिनगर ब्रम्हपुरी हे डयुटीवर गेले असता कोणीतारी अज्ञात ईसमाने घरात प्रवेश करून सोन्याचे दागीने व नगदी असा एकुन १,२१,५०० रू चा माल चोंरून नेला अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पो.स्टे.ब्रम्हपुरी येथे अप.क्र. ३६४/१९ कलम ४५४, ३८०, ३४ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वेगवेगळे तर्क लावुन माहिती काढण्यास सुरूवात केली. गोपनीय माहितीवरून चंद्रपुर जिल्हयातील रेकॉर्डवरील अटटल घरफोडीचे गुन्हेगार **१) विष्णु खोकन विश्वास वय ३४ वर्ष रा. शातिनगर बंगाली कॅम्प चंद्रपुर, २) पींकु नरेन्द्र मिस्त्री वय ३७ वर्ष रा. अरूण नगर ता. अर्जुनी मोरगाव जिल्हा गोंदिया** हे दोघेही सोन्याचे दागीने विकण्याकरीता चंद्रपुर येथील सराफा बाजारत फिरत आहेत अशी माहीती मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाख पथकाने सापळा रचुन दोन्ही आरोपींना ताब्यात घेवुन झडती घेतली असता त्यांचे ताब्यात **१) कि १०,०००/रू एक सोन्याचा गोप वजन ५ ग्राम २) किं. ६०००/रू एक जोड कानातील टॉप्स वजन ३ ग्राम** असे दागीने मिळुन आले. त्यांना सदर दागीन्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी ब्रम्हपुरी येथुन चोरी केल्याची कबुली दिली. सदर आरोपीतांची कसुन चौकशी केली असता आरोपींकडुन **१) दोन नग सोन्याचे गोफ प्रत्येकी १५ ग्रॅम, २) एक सोन्याचा गोप वजन ५ ग्राम ३) दोन जोड सोन्याचे कानातले चेन टॉप वजन २० ग्रॅम ४) एक जोड कानातील टॉप्स वजन ३ ग्रॅम** असे दागीने हस्तगत करण्यात आले असुन दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी हे घरफोडी चोरीचे अटटल गुन्हेगार असुन त्यांचे कडुन अधिक गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे. पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात स्थानीक गुन्हे शाखेतील पथक पो.उप नि. एन. आय. जायले, स.फौ. पदमाकर भोयर, पो.हवा. महेन्द्र भुजाडे, ना.पो.शि. प्रकाश बल्की, पो.शि. सतिष बगमारे, पो.शि. प्रांजल झिलपे, पो.शि. मिलींद जांभुळे, पो.शि.जावेद सिददीकी, पो.शि. कुंदन बावरी, नितीन रायपुरे यांनी पार पाडली

———————————————————————————————